नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे | Year - 4rd | अंक - १४१ | Issue - 141 | वार - शुक्रवार दि. १६ ऑक्टोबर २०२६ | Blow- Friday Date 16 OCTOBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# एसटीच्या १५ टक्के हंगामी भाडेवाढीचा प्रस्ताव नामंजूर!

## एसटी प्रशासनाने परिवहनमंत्र्यांकडे सादर केला होता प्रस्ताव; पर्यायी मार्गातून अडचणींवर मात करु : परिवहनमंत्री प्रताप सरनाईक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : दुष्काळाच्या झळांनी होरपळणारा शेतकरी, महागाईमुळे आर्थिक ओढाताण सहन करणारा सर्वसामान्य नागरिक आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करताना होणारी दम छाक, अशा परिस्थितीत जनतेवर भाडेवाढीचा अतिरिक्त भार कशासाठी, असा सवाल उपस्थित करत परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिवाळीच्या गर्दीच्या हंगामासाठी प्रस्तावित केलेली १५ टक्के हंगामी भाडेवाढ नामंजूर केली.

दरवर्षी दिवाळीच्या गर्दीच्या काळात एसटीच्या प्रवासी भाड्यात हंगामी वाढ केली जाते. यंदाही १ ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत प्रवासी भाड्यात सरसकट १५ टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव एसटी प्रशासनाने मंत्री सरनाईक यांच्याकडे सादर केला होता. मात्र, आधीच आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या जनतेवर आणखी भार टाकणे योग्य नसल्याची भूमिका घेत त्यांनी हा प्रस्ताव फेटाळून लावला. 'आधीच संकटांनी घेरलेल्या जनतेला भाडेवाढीचा चटका देऊन त्यांच्या जखमेवर मीठ चोळणे मला मान्य नाही,' असे स्पष्ट करीत त्यांनी जनहिताला प्राधान्य दिले.



एसटी महामंडळाला आर्थिक तोटा सहन करावा लागत असला, तरी त्याची भरपाई सर्वसामान्य प्रवाशांकडून करणे योग्य ठरणार नाही. एसटीची 'लालपरी' ही ग्रामीण महाराष्ट्रातील लाखो नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग आहे. शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, नोकरदार, ज्येष्ठ नागरिक आणि कष्टकरी वर्गासाठी ती परवडणाऱ्या प्रवासाचा महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे भाडेवाढीचा थेट परिणाम त्यांच्या दैनंदिन खर्चावर झाला असता. विशेषतः दुष्काळामुळे अडचणीत सापडलेल्या कुटुंबांना हा अतिरिक्त भार सहन करणे कठीण झाले असते.

'शासन संवेदनशील आहे. संकटाच्या काळात शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेला वाऱ्यावर सोडणार नाही,' असा विश्वास व्यक्त करीत मंत्री सरनाईक म्हणाले की, जनतेच्या अडचणी समजून घेऊन तिला दिलासा देणे ही शासनाची जबाबदारी आहे. आर्थिक गणिते महत्त्वाची असली, तरी जनतेच्या वेदना



आणि तिचा जगण्याचा संघर्ष यांचाही विचार होणे आवश्यक आहे.

एसटी महामंडळाच्या आर्थिक अडचणींवर मात करण्यासाठी पर्यायी उपाययोजना शोधल्या पाहिजेत. दुर्गम गावांपासून शहरांपर्यंत सुरक्षित, विश्वासार्ह आणि परवडणारी प्रवासी सेवा उपलब्ध करून देणे हे महामंडळाचे मूलभूत कर्तव्य आहे. त्यामुळे आर्थिक तोट्याचे ओझे थेट प्रवाशांवर टाकण्याऐवजी त्यावर अन्य मार्गांनी तोडगा काढण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जनतेच्या संकटाच्या काळात त्यांच्या खिशाला हात घालण्यापेक्षा त्यांच्या डोळ्यांतील अश्रू पुसणे अधिक महत्त्वाचे आहे. एसटीच्या आर्थिक अडचणींवर मात करण्यासाठी पर्यायी मार्ग शोधू; मात्र अडचणीत असलेल्या जनतेला दिलासा देण्याचे कर्तव्य विसरणार नाही,' या भूमिकेतून मंत्री सरनाईक यांनी प्रस्तावित भाडेवाढीला नकार देत सर्वसामान्य प्रवाशांना दिलासा देण्याचा निर्णय घेतला.



# राज्यात सुटे मसाला विकण्यास बंदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात आता सुटे मसाले विकण्यास बंदी घालण्यात आली आहे. अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आज पत्रकार परिषद घेत याबाबत घोषणा केली. सुटे मसाले विकल्यास, मसाल्यात रंगांची भेसळ केल्यास थेट १० लाख रुपयांचा दंड आणि ७ वर्षे जेलची घोषणा करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील नागरिकांना सुरक्षित, भेसळमुक्त व दर्जेदार मसाले उपलब्ध व्हावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासनाने मसाले व मसाल्यांपासून तयार होणाऱ्या खाद्यपदार्थांच्या उत्पादन, प्रक्रिया, साठवण, वाहतूक, वितरण व विक्रीसंदर्भात सर्वसमावेशक अनुपालन आदेश तयार केला आहे. अन्न सुरक्षा आयुक्त यांच्या आदेशानुसार राज्यातील मसाला व्यवसायाशी संबंधित सर्व अन्न व्यवसाय चालकांनी अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ व त्याअंतर्गत लागू असलेल्या नियम व विनियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

मसाल्यांमध्ये कृत्रिम रंग, निकृष्ट दर्जाचा कच्चा माल, वापरलेले अथवा अर्क काढलेले मसाले, परकीय पदार्थ व अन्य भेसळयुक्त घटक मिसळल्यामुळे ग्राहकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. अशा प्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी उत्पादनापासून विक्रीपर्यंत संपूर्ण पुरवठा साखळीची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.

### सर्व प्रकारच्या मसाला व्यवसायांना आदेश लागू

सदर आदेश हळद, मिरची, धणे, जिरे, काळी मिरी, दालचिनी, लवंग, वेलदोडे, हिंग, केशर, खसखस, मिश्र मसाले, गरम मसाला, करी पावडर तसेच अन्य मसाले व मसाल्यांपासून तयार केलेल्या उत्पादनांना लागू आहे. मसाले स्वच्छ करणे, वाळविणे, दळणे, मिश्रण करणे, पॅकिंग, पुनर्पेकिंग, साठवण, वाहतूक व विक्री करणारे उत्पादक, व्यापारी, घाऊक व किरकोळ विक्रेते, ई-कॉमर्स व्यवसाय चालक, हॉटेल्स, उपाहारगृहे, केटरर्स व संस्थात्मक स्वयंपाकगृहे यांचा यामध्ये समावेश आहे.

**नियमांचे उल्लंघन झाल्यास १० लाखांचा दंड, ७ वर्षे कारावासाची शिक्षा**

### प्रतिबंधित रंग आणि भेसळयुक्त पदार्थांना सक्त मनाई

मसाल्यांमध्ये मेटॅनिल यलो, रोडामाइन बी, सुदान डाईज, लेड क्रोमेट यांसारखे प्रतिबंधित रंग व आरोग्यास हानिकारक पदार्थांचा वापर करता येणार नाही. तसेच मसाल्यांचे वजन अथवा प्रमाण वाढविण्यासाठी विटांची भुकटी, खडू, लाकडाचा भुसा, परकीय स्टार्च अथवा अन्य अनधिकृत पदार्थ मिसळणे, निकृष्ट दर्जाच्या मसाल्यांचे मिश्रण करणे किंवा अर्क काढून घेतलेल्या मसाल्यांची विक्री करणे यावर कारवाई करण्यात येईल. मसाले रस्ते आणि गटारे, कचराकुंड्यांजवळ वाळवता येणार नाहीत. मसाले सार्वजनिक रस्ते, डांबरी पृष्ठभाग, गटारे, कचराकुंड्या अथवा जनावरांच्या गोठ्यांजवळ वाळविता येणार नाहीत. उत्पादन व साठवण परिसर स्वच्छ, कोरडा, कीडमुक्त व दूषिततेपासून सुरक्षित असणे आवश्यक आहे. मसाल्यांसोबत रसायने, कीटकनाशके, औद्योगिक रंग किंवा इतर हानिकारक पदार्थ साठविण्यास मनाई करण्यात आली आहे.

**डिजिटल शासनसेवा प्लॅटफॉर्म तात्काळ सुरु करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश**

# महाराष्ट्रात डिजिटल शासनसेवांना मिळणार नवी गती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील नागरिकांना शासकीय सेवा अधिक जलद, सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने ऑनलाइन उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने डिजिटल सेवा वितरणावर भर दिला आहे. 'महाडीबीटी २.०', 'आपले सरकार २.०' आणि 'मैत्री २.०' या प्लॅटफॉर्मवरील प्रलंबित कामे ३१ डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. या डिजिटल सेवा प्लॅटफॉर्मचे २६ जानेवारी रोजी लोकार्पण करण्याच्या दृष्टीने सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील वर्षा निवासस्थानी यासंदर्भात बैठक पार पडली. या बैठकीत डिजिटल सेवांचे एकत्रीकरण, प्रलंबित कामांचा आढावा आणि नागरिकांना अखंड ऑनलाइन सेवा उपलब्ध करून देण्याबाबत महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, शासनाने संपूर्ण प्रक्रियेसाठी 'एंड-टू-एंड' डिजिटल प्लॅटफॉर्म तयार केला आहे. त्याचे बॅकएंड 'जीपीआर'नुसार सक्षमपणे विकसित करणे आणि प्रत्यक्ष सेवा वितरण प्रभावी होणे आवश्यक आहे. ही व्यवस्था अखंडपणे कार्यान्वित झाल्यास विभागांवरील दैनंदिन प्रशासकीय ताण ५० टक्क्यांनी कमी होईल आणि नागरिकांना शासकीय कार्यालयांशी प्रत्यक्ष संपर्क साधण्याची आवश्यकता भासणार नाही. विभागांनी विकासाच्या टप्प्यावर आवश्यकतांमध्ये वारंवार बदल करू नयेत. त्याचप्रमाणे महाआयटीने विभागांच्या अपेक्षांनुसार तांत्रिक विकास करावा. विभागांच्या अडचणींची नियमित नोंद घेऊन त्यांचे कालबद्ध निराकरण करण्यासाठी निश्चित कार्यपद्धती राबवावी, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

उच्चाधिकार समितीने विषय मंजूर केल्यानंतर संबंधित विभागांनी तीन दिवसांत शासन निर्णयाची प्रक्रिया पूर्ण करावी. प्रत्येक विभागाने उलट कालगणनेनुसार नियोजन करून प्रलंबित कामे निकाली काढावीत, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

डिजिटल सेवा प्लॅटफॉर्म निर्धारित वेळेत सुरू करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी कालबद्ध नियोजनावर भर दिला. सर्व विभागांनी प्रलंबित कामांचा आढावा घेऊन निश्चित मुदतीत कामे पूर्ण करावीत, असे निर्देश देण्यात आले.उच्चाधिकार समितीने एखादा विषय मंजूर केल्यानंतर संबंधित विभागांनी तीन दिवसांत शासन निर्णयाची प्रक्रिया पूर्ण करावी, असेही मुख्यमंत्री म्हणाले. विकास प्रक्रियेदरम्यान आवश्यकतांमध्ये वारंवार बदल टाळावेत आणि विभागांच्या तांत्रिक अडचणींचे नियमितपणे निराकरण करण्यासाठी निश्चित कार्यपद्धती तयार करावी, अशी सूचनाही त्यांनी केली.

केवळ तांत्रिक कामे पूर्ण करणे म्हणजे डिजिटल प्लॅटफॉर्मचे यश नव्हे, तर नागरिकांना सेवा वापरताना प्रत्यक्षात किती सोय होते, हे महत्त्वाचे आहे, असे



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. नागरिकांना शासकीय सेवा सहजपणे मिळतात का, अर्ज प्रक्रिया सुलभ आहे का आणि सेवा वेळेत पूर्ण होते का, याबाबत सकारात्मक अभिप्राय मिळणे आवश्यक आहे. नागरिकांचा अनुभव सुधारण्यावर संबंधित विभागांनी विशेष लक्ष द्यावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

विविध विभागांची बाह्य पोर्टल्स 'आपले सरकार' आणि 'मैत्री' या प्लॅटफॉर्मशी ३० नोव्हेंबरपर्यंत जोडण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. उच्चाधिकार समितीने मंजूर केलेल्या राज्य शासन ते नागरिक आणि राज्य शासन ते व्यवसाय या श्रेणीतील सेवांचा विकास आणि एकात्मीकरणही याच कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. याशिवाय, वापरकर्ता स्वीकार चाचणी, क्षेत्रीय चाचणी, अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण, वापरकर्ता पुस्तिका तयार करणे आणि नागरिकांमध्ये जनजागृती करणे ही कामे १५ डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### १,२२२ सेवांचा आढावा; ७२३ सेवांचे तर्कसंगतीकरण

शासकीय सेवा अधिक सुलभ करण्यासाठी तपासण्यात आलेल्या १,२२२ सेवांपैकी ७२३ सेवांचे तर्कसंगतीकरण करण्यात आले आहे. यामध्ये ३२ बिगर-सेवा, ८३ कालबाह्य सेवा, ५१ तत्काळ सेवा आणि ३३३ दुबार किंवा पूरक सेवांचा समावेश आहे. उच्चाधिकार समितीच्या मान्यतेने ४६ उपविभागांतील ४६७ सेवांवर पुढील प्रक्रिया सुरू असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

निवृत्तिवेतनासाठी डेटाबेसच्या माध्यमातून संभाव्य लाभार्थ्यांची सक्रियपणे ओळख करण्याची नवी प्रक्रिया प्रस्तावित आहे. राज्यभरात ८ लाख ९० हजार संभाव्य लाभार्थी ओळखण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे क्रीडा ई-प्रमाण प्रणालीचा राज्य शिक्षण मंडळाशी समन्वय करून विद्यार्थ्यांचे सत्यापित क्रीडा गुण परीक्षेच्या निकालात आपोआप समाविष्ट करण्याची प्रक्रिया विकसित करण्यात येणार आहे. विविध महामंडळांच्या १३० योजना प्रमाणित अर्जांसह महाडीबीटी २.० वर आणल्या जाणार आहेत. नऊ विभागांच्या १ हजार ७०० पेक्षा अधिक वसतिगृहांसाठी एकत्रित 'महाहोस्टेल' प्लॅटफॉर्म, तसेच सर्व शासकीय कंत्राटांसाठी 'एक कंत्राटदार-एक आळख क्रमांक' असलेले एकत्रित नोंदणी पोर्टल विकसित करण्यात येणार आहे.

राज्यातील ३२ हजार ४७९ सक्रिय सेवा केंद्रांपैकी १७ हजार ५१७ केंद्रांनी प्रमाणित निकषांची पूर्तता केल्याचा अहवाल दिला असून १२ हजार ८२४ केंद्रांची पडताळणी पूर्ण झाली आहे. अर्जसंख्या, कार्यरत दिवस, मंजुरीचे प्रमाण, नागरिकांचा अभिप्राय आणि गुणवत्ता निकषांच्या आधारे केंद्रांचे 'स्मार्ट', 'सक्षम', 'उदयोन्मुख' आणि 'प्रयत्नशील' असे वर्गीकरण करण्यात येत आहे. 'स्मार्ट' केंद्रांचा गौरव २६ जानेवारी २०२७ रोजी करण्याचे नियोजन असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

या बैठकीला उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ड. आशिष शेलार, राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव यांच्यासह गृह, वित्त, सार्वजनिक बांधकाम, ऊर्जा, महसूल, नगरविकास, अन्न व नागरी पुरवठा, पर्यटन, उद्योग, सामाजिक न्याय, शालेय शिक्षण, कृषी, महिला व बाल विकास, पदुम, कामगार, ओबीसी, क्रीडा व युवक कल्याण विभागाचे वरिष्ठ प्रशासकीय सनदी अधिकारी, समग्र संस्था प्रतिनिधी यांच्यासह टीम महाआयटी, टीम मैत्री, टीम समग्र उपस्थित होती.

एकंदरीत, महाराष्ट्रातील डिजिटल शासनसेवा अधिक वेगवान, सुलभ आणि नागरिककेंद्रित करण्यासाठी राज्य सरकारने कालबद्ध नियोजनावर भर दिला आहे. आता निश्चित मुदतीत प्रलंबित कामे पूर्ण करून या सुविधांचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांपर्यंत कितपत पोहोचतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सर्व उत्सवांमध्ये वर्षभर सार्वजनिक ठिकाणी फटाके वाजवण्यास पूर्ण बंदी, मुंबई हायकोर्टाचे कडक निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यभरात सध्या नवरात्रीचा उत्साह आहे. येत्या २० ऑक्टोबरला दसरा सण असणार आहे. त्यानंतर काही दिवसांनी दिवाळी सणाचा उत्साह राज्यभरात असणार आहे. दिवाळीत रात्री आकाशात फटाक्यांची आतषबाजी बघायला मिळते. अनेकदा सार्वजनिक ठिकाणी किंवा सार्वजनिक रस्त्यावंर फटाके फोडले जातात. यामुळे दुर्घटना घडण्याची देखील भीती असते. तसेच फटाक्यांमुळे होणारे ध्वनी आणि वायू प्रदूषणाचा मुद्दा नियमित चर्चेत येतो. याच विषयी मुंबई हायकोर्टात 'सुओ मोटो' याचिकेवर सुनावणी पार पडली. यावेळी मुंबई हायकोर्टाने हे महत्त्वाचे आदेश दिले आहेत.

खरंतर मुंबई हायकोर्टाने ध्वनी आणि वायू प्रदूषणाच्या समस्येच्या निमित्तानं याआधीच २२ सप्टेंबर रोजी फटाक्यांच्या बाबतीत निर्देश होते. त्यानुसार, हायकोर्टाने सार्वजनिक ठिकाणी आणि सार्वजनिक रस्त्यांवर कोणत्याही प्रकारचे फटाके वाजवण्यावर बंदी घातली होती. मात्र, तरीही गणेशोत्सव काळात काही ठिकाणी त्याचं उल्लंघन झालं. या गुरुवारी याचिकेवर पुढची सुनावणी होती. त्याचदरम्यान 'दी असोसिएशन ऑफ फायरवर्क्स ट्रेडर्स'ने एक अर्ज केला आणि २२ सप्टेंबर रोजीच्या आदेशाबाबत नेमके स्पष्टीकरण देण्याची विनंती केली. त्यामुळे गुरुवारच्या सुनावणीनंतर न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठाने अधिक स्पष्टीकरण देणारा आदेश दिला. शिवाय सविस्तर आदेशाची प्रत नंतर उपलब्ध केली जाईल, असेही खंडपीठाने स्पष्ट केलं. तसंच फटाक्यांच्या उत्पादनावर आणि विक्रीवर बंदी घतली नसल्याचंही खंडपीठाने स्पष्ट केलं. सार्वजनिक ठिकाणे आणि सार्वजनिक रस्त्यांवर फटाके वाजवण्यावरील बंदी ही संपूर्ण वर्षभरासाठी आणि सर्व उत्सवांमध्ये लागू असेल. याविषयी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वर्तमानपत्रांमध्ये, इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये तसेच सोशल मीडियामध्ये व्यापक जनजागृती करावी. प्रशासनाने बंदीच्या व्यापक जनजागृतीसाठी हवे तर सेलिब्रिटींची मदत घ्यावी. पोलिसांनी वॉर्ड स्तरावर याविषयी सूचना प्रसिद्ध कराव्यात. 'उत्सव, सण साजरे करण्यास कोणताही आक्षेप नसल्याचे आम्ही यापूर्वीच स्पष्ट केलेलं आहे. परंतु, कोणताही उत्सव हा नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम करणारा आणि तडजोड करणारा असू शकत नाही. ध्वनी व वायू प्रदूषण सहन करत नागरिकांना जगणं भाग पाडलं जाऊ शकत नाही.

## संपादकीय....

### एफडीएचा दणका

महाराष्ट्रात आता सुटे मसाले विकण्यास बंदी घालण्यात आली आहे. अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आज पत्रकार परिषद घेत याबाबत घोषणा केली. सुटे मसाले विकल्यास, मसाल्यात रंगांची भेसळ केल्यास थेट १० लाख रुपयांचा दंड आणि ७ वर्षे जेलची घोषणा करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील नागरिकांना सुरक्षित, भेसळमुक्त व दर्जेदार मसाले उपलब्ध व्हावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासनाने मसाले व मसाल्यांपासून तयार होणाऱ्या खाद्यपदार्थांच्या उत्पादन, प्रक्रिया, साठवण, वाहतूक, वितरण व विक्रीसंदर्भात सर्वसमावेशक अनुपालन आदेश तयार केला आहे. अन्न सुरक्षा आयुक्त यांच्या आदेशानुसार राज्यातील मसाला व्यवसायाशी संबंधित सर्व अन्न व्यवसाय चालकांनी अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ व त्याअंतर्गत लागू असलेल्या नियम व विनियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. मसाल्यांमध्ये कृत्रिम रंग, निकृष्ट दर्जाचा कच्चा माल, वापरलेले अथवा अर्क काढलेले मसाले, परकीय पदार्थ व अन्य भेसळयुक्त घटक मिसळल्यामुळे ग्राहकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. अशा प्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी उत्पादनापासून विक्रीपर्यंत संपूर्ण पुरवठा साखळीची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. सदर आदेश हळद, मिरची, धणे, जिरे, काळी मिरी, दालचिनी, लवंग, वेलदोडे, हिंग, केशर, खसखस, मिश्र मसाले, गरम मसाला, करी पावडर तसेच अन्य मसाले व मसाल्यांपासून तयार केलेल्या उत्पादनांना लागू आहे. मसाले स्वच्छ करणे, वाळविणे, दळणे, मिश्रण करणे, पॅकिंग, पुनर्पॅकिंग, साठवण, वाहतूक व विक्री करणारे उत्पादक, व्यापारी, घाऊक व किरकोळ विक्रेते, ई-कॉमर्स व्यवसाय चालक, हॉटेल्स, उपाहारगृहे, केटरर्स व संस्थात्मक स्वयंपाकगृहे यांचा यामध्ये समावेश आहे.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांदुळवाडीत वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

## विद्यार्थ्यांनी एक तास पुस्तकांचे वाचन करत घेतला उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधि सुधाकर रणदिवे : भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि प्रख्यात विचारवंत भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तांदुळवाडी येथे वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, वाचन संस्कृती रुजावी आणि पुस्तकांशी मैत्री दृढ व्हावी, या उद्देशाने शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

वाचन प्रेरणा दिनानिमित्त विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रोत्साहित करण्यात आले. यावेळी शाळेच्या ग्रंथालयातील सर्व पुस्तके विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आली. विद्यार्थ्यांनी सलग एक तास विविध पुस्तकांचे वाचन करून या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या कृतीयुक्त वाचन उपक्रमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीची पुस्तके वाचण्याची संधी मिळाली. वाचनामुळे ज्ञानात भर पडते, विचारशक्ती विकसित होते आणि व्यक्तिमत्त्व घडण्यास मदत होते, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.



कार्यक्रमादरम्यान अनेक विद्यार्थ्यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. त्यांचे बालपण, शिक्षण, वैज्ञानिक क्षेत्रातील योगदान, भारताच्या संरक्षण व अंतराळ संशोधन क्षेत्रातील कार्य तसेच देशाचे राष्ट्रपती म्हणून त्यांनी बजावलेली भूमिका याविषयी विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले. प्रतिकूल परिस्थितीतही जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर यश संपादन करता येते, याचे प्रेरणादायी उदाहरण म्हणजे डॉ. कलाम यांचे जीवन असल्याचे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्यात आले.

यावेळी शाळेतील शिक्षक श्री. संतोष मोहिते आणि श्रीमती आशा पवार यांनी विद्यार्थ्यांना डॉ. अब्दुल कलाम यांच्या जीवनचरित्राची माहिती दिली. त्यांच्या साध्या राहणीमानातून, ज्ञानाच्या उपासनेतून, देशप्रेमातून आणि विद्यार्थ्यांविषयीच्या आत्मीयतेतून प्रत्येकाने प्रेरणा घ्यावी, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी नियमित वाचनाची सवय लावून घ्यावी, विविध विषयांवरील पुस्तके वाचावीत आणि वाचनातून मिळणाऱ्या ज्ञानाचा उपयोग दैनंदिन जीवनात करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी शाळेचे मुख्याध्यापक श्री. संतोष भोजने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पुस्तक हे ज्ञानाचे भांडार असून नियमित वाचनामुळे भाषिक कौशल्ये, कल्पनाशक्ती, आकलनक्षमता आणि आत्मविश्वास वाढतो, असे त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी मोबाईल आणि इतर मनोरंजनाच्या साधनांमध्ये वेळ घालविण्याऐवजी पुस्तकांच्या सहवासात अधिक वेळ व्यतीत करावा आणि वाचनाला आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवावे, असे त्यांनी सांगितले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. सयाजी शिंदे आणि श्रीमती रसिका आगरकर यांनी विशेष प्रयत्न केले. विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी, त्यांच्यात ज्ञानार्जनाची प्रेरणा निर्माण व्हावी आणि शाळेत वाचन संस्कृती अधिक बळकट व्हावी, या दृष्टीने आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या विचारांना अभिवादन करत विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्याचा संदेश या वाचन प्रेरणा दिनाच्या माध्यमातून देण्यात आला.

# नवरात्र महोत्सव: ललित पंचमी पाचवी माळ; श्री विठ्ठलास अलंकार, रूक्मिणी मातेस पारंपारिक वनदेवी माता पोषाखासह अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : घटस्थापनेपासून नवरात्र महोत्सवास सुरवात सुरु झाली आहे, या निमित्त दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे पाचव्या दिवशी श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये रूक्मिणी मातेस वनदेवी माता पोषाख परिधान करण्यात आला असल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.

श्री विठ्ठलास सोन्याचा मुकुट, कौस्तुभ मणी, दंडपेठया जोड मोठा, मोत्याचा तुरा, शिरपेच मोठा दहा लोलक असलेला, शिरपेच मोठा दोन लोलक असलेला, चांदीचा मत्स्य, तोडे जोड, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, मोत्याची कंठी दोन पदरी, इमिटेशन नेकलेस इत्यादी प्रकारचे अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच रुक्मिणी सोन्याचा मुकुट, सोने मोती चांदवड, चिंचपेटी हिरवी, तोडेजोड, मोठी नथ, मोत्याचा कंठा, पैंजण जोड इत्यादी प्रकारचे अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत. तसेच राधिका मातेस सिद्धेश्वर टोप, पुतळ्यांची माळ, जवेची माळ व सत्यभामादेवीला नक्षी टोप, पुतळ्यांची माळ, जवेची माळ इत्यादी प्रकारचे अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत, तसेच महालक्ष्मी मातेस सोन्याचे गंठण,अष्टपैलू मण्याची कंठी तीन पदरी, साखळ्या जोड, तांदळाहार सात पदरी, लफ्फा, मोत्याची कंठी एक पदरी, चांदीची छत्री इत्यादी अलंकार परिधान करण्यात आलेले आहे. श्री व्यंकटेशस नक्षी टोप प्रभावळीसह, नामनिळाचा, हिऱ्याचे कंगनजोड, दंडपेठ्या जोड, मोत्याची कंटी एक पदरी,





मोत्याची कंठी दोन पदरी, मरवाडी पेठयांच्या मोत्यांचा हार, तोरडीजोड, तुळशीची माळ एक पदरी, चांदीची काठी इत्यादी अलंकार परिधान करण्यात आलेले आहे. तसेच मंदिर समितीच्या अखत्यारीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई-तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपारिक पोषाख करण्यात येत असल्याचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी सांगीतले.

# तानाजी कदम एक लढवय्ये पँथर : दि.१६ ऑक्टोबर त्यांच्या वाढदिवसा निमित्ताने आभिष्टचिंतन

ष भारतीय दलित पँथरच्या माध्यमातून नामदार रामदासजी आठवले साहेब यांच्या नेतृत्वाखाली सबंध महाराष्ट्रभर तालुका जिल्ह्यामध्ये अनेक कार्यकर्ते चळवळीचे नेतृत्व करण्यासाठी निर्माण झाले आहेत .आज ही रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारता मंत्री भारत सरकार नामदार रामदासजी आठवले साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून प्रामाणिकपणे आणि निष्ठेने काम करणारे निष्ठावंत कार्यकर्त्यांची फळी महाराष्ट्रात आहे.त्यात धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर येथील तानाजी कदम यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल.

तानाजी कदम यांनी अगदी लहान वयापासूनच आंबेडकरी चळवळीशी जोडले गेले.त्याच्या ऐन उमेदीच्या काळात महाराष्ट्रामध्ये नामदार रामदासजी आठवले साहेबांच्या नेतृत्वाखाली दलित पँथरचा एक झंजावात सुरू झाला.शहरी झोपडपट्टी भागा बरोबरच महाराष्ट्रातील तमाम गाव खेडी वाडी वस्ती मध्ये दलित पँथरच्या शाखा निर्माण होऊ लागल्या उपेक्षित बहुजनांवर प्रस्थापित्याकडून होणाऱ्या अन्न अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम दलित पँथरच्या माध्यमातून चालू होतं.त्यातच डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादच्या नामांतराचा लढा सुरू झाला तब्बल १४ वर्षे चाललेल्या या नामांतराच्या लढाईमध्ये महाराष्ट्रातील अनेक तरुण आठवले साहेबांच्या नेतृत्वाखाली सामील झाले. यातूनच महाराष्ट्रात एक मोठ्या प्रमाणात दलित समाजाचे मोठे संघटन उभे राहिले त्यात मास लिडर म्हणून रामदास आठवले साहेब हे संबध देशभरात चर्चेला आले आणि अखेर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अशा नामविस्ताराने आंबेडकरी अनुयायांच्या अस्मितेची नामांतराची लढाई लढाईला यश आलं या एकूणच चळवळीमध्ये तुळजापूर तालुक्यातून अनेक कार्यकर्ते पुढे आले आणि आपल नेतृत्व नेतृत्व विकसित केले. त्यात तानाजी कदम यानी एक लढवय पँथर म्हणून आपली ओळख निर्माण केली.

तुळजापूर तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ दलित पँथरच्या शाखा स्थापण करण्यामध्ये तानाजीचा फार मोठा वाटा आहे. दलित पँथरच सन १९८९ ला महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील खुल्या पत्रावर आधारित स्थापन झालेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षामध्ये विलगीकरण करण्यात आले त्याच वेळेस गावागावातील तमाम पँथरच्या शाखा ह्या रिपब्लिकन पक्षात विलीनीकरण करण्यात आल्या आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया तुळजापूर तालुका अध्यक्ष म्हणून तानाजी कदम यांचं नेतृत्व पुढे आलं.तानाजी कदम यांनी आपल्या सर्व नेत्यांची कार्यकर्त्यांची समन्वय साधत तुळजापूर तालुका पिंजून काढला आणि गावागावात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या



शाखा निर्माण झाल्या यामध्ये आनंद, पांडागळे,दुर्वास बनसोडे प्रमोद कांबळे, दिवंगत दयानंद बनसोडे,बाबासाहेब बनसोडे असे कितीतरी नावे सांगता येतील या कार्यकर्त्यांनी सामाजिक जाणीव ठेवून आंबेडकर चळवळीमध्ये काम करत होते करत आहेत. या सर्वांचा योग्य तो सन्मान करत तानाजीने आजतागायत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या माध्यमातून एक वेगळ अस्तित्व निर्माण केल. पक्षाच्या वेळोवेळी होणाऱ्या आदेशाचे पालन करत तुळजापूर तालुक्यात गोरगरिबांच्या न्याय हक्कासाठी अनेक मोर्चे आंदोलने केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा तुळजापूर शहरात असलेला अर्धाकरी पुतळ्याच्या ठिकाणी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा पूर्णाकृती पुतळा उभारावा यासाठी सातत्याने आंदोलने उपोषण करून पाठपुरावा केला.या सर्वच आंदोलनामध्ये इतर सर्व कार्यकर्ते नेते यांच्या बरोबरच तानाजी कदम यांचे योगदान फार मोठे आहे.

तसेच हडको तुळजापूर येथे दोन मजली बौद्ध विहार उभारण्या मध्ये तानाजी कदम यांचा हिंहाचा वाटा आहे.

आपल्या सर्व कार्यकर्त्यां समवेत राजाभाऊ ओव्हाळ यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली सतत पाठपुरावा केल्याने शेवटी तुळजापूर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभा राहिला. अशी कितीतरी प्रसंग,कितीतरी उदाहरणे त्यांच्या नेतृत्वाखाली झालेले आंदोलने सांगता येतील असा एक लढवायला पँथर म्हणून आज ते सर्वत्र परिस्थिती आहेत.

आपल्या या सामाजिक राजकीय धम्म चळवळीत तानाजी कदम हे प्रत्यक्ष जरी नगरसेवक होऊ शकले नसले तरी त्यांच्या सहकार्याने त्यांच्या अर्ध्यागिनी वैशाली तानाजी कदम ह्या पाच वर्ष नगरसेवक म्हणून जनतेची सेवा केली यात या कामी आपल्या पत्नी च्या पाठीमागे खंबीरपणे समर्थ साथ देत तानाजी कदम यांनी वैशालीताई यांचे नेतृत्व पुढे आणलं आहे. दि.१६ सप्टेंबर हा त्यांचा वाढदिवस आहे त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांना खूप खूप हार्दिक शुभेच्छा...!

**– एस. के. गायकवाड**
मु.पो. वागदरी ता. तुळजापूर
(लेखक रिपब्लिकन चळवळीतील कार्यकर्ते आहेत)

# रयत शिक्षण संस्थेच्या शिक्षकांच्या प्रश्नांना न्याय; ज्ञानयात्री डॉ. बी. पी. रोंगे सरांच्या कार्याची शिक्षकवर्गात चर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टेंभुर्णी: शिक्षकांचे प्रश्न समजून घेणे, त्यांचा अभ्यास करणे आणि ते मार्गी लावण्यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा करणे, हीच प्रभावी नेतृत्वाची खरी ओळख असते. याच कार्यपद्धतीचा प्रत्यय सोलापूर जिल्ह्यातील रयत शिक्षण संस्थेच्या विविध शाळांमधील मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीतून आला आहे. पदोन्नतीनंतर तब्बल आठ महिन्यांपासून प्रलंबित असलेला पदमान्यता व वेतनाचा प्रश्न श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूटचे संस्थापक व स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या पुढाकाराने मार्गी लागल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे शिक्षकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने प्रयत्न करणारे नेतृत्व म्हणून डॉ. रोंगे सरांच्या कार्याची जिल्ह्यात चर्चा होत आहे.





आमदार होण्यापूर्वीच शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी डॉ.बी.पी. रोंगे सरांनी घेतलेला पुढाकार महत्त्वपूर्ण मानला जात आहे. विशेषतः रयत शिक्षण संस्थेच्या शाळांमधील पदाधिकारी व शिक्षकांच्या प्रश्नांबाबत त्यांनी दाखविलेली तत्परता, प्रशासकीय प्रक्रियेचा अभ्यास आणि पाठपुराव्याची भूमिका यामुळे शिक्षकवर्गाचे लक्ष त्यांच्या कार्याकडे वेधले गेले आहे. गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी अर्थात श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूटचे संस्थापक, स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य तसेच खेड (ता. उत्तर सोलापूर) येथील स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष डॉ. बब्रुवाहन पांडुरंग रोंगे हे गेल्या वर्षापासून पुणे विभागातील शिक्षकांच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी सक्रिय आहेत. पुणे, सोलापूर, सांगली, सातारा आणि कोल्हापूर या पाचही जिल्ह्यांतील शाळा-महाविद्यालयांना भेटी देत तेथील शिक्षक, मुख्याध्यापक, प्राचार्य व संस्थाचालकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेण्यावर त्यांनी भर दिला आहे. शिक्षकांच्या प्रश्नांकडे केवळ आश्वासनांच्या दृष्टिकोनातून न पाहता, संबंधित प्रकरणाचा अभ्यास, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, योग्य प्रशासकीय मार्गाचा अवलंब आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा या माध्यमांतून प्रश्न सोडविण्याची त्यांची कार्यपद्धती विशेष चर्चेत आहे. त्यामुळे शिक्षकांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी ठोस प्रयत्न करणारे नेतृत्व म्हणून डॉ. रोंगे सरांकडे पाहिले जात आहे. दरम्यान, शिक्षकांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेण्याच्या या उपक्रमात डॉ. रोंगे सरांच्या पत्नी, श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या व्हाईस चेअरमन व स्वेरीच्या विश्वस्त सौ. प्रेमलता रोंगे यादेखील सक्रिय सहभाग घेत आहेत. विविध शाळा व महाविद्यालयांना भेटी देऊन त्या डॉ. रोंगे सरांच्या कार्यपद्धतीची, शिक्षकांच्या प्रश्नांबाबतच्या भूमिकेची आणि त्यांच्या प्रयत्नांची माहिती शिक्षकांपर्यंत पोहोचवत आहेत. याच अनुषंगाने नुकत्याच माढा तालुक्यातील मोडनिंब व परिसरातील विविध शैक्षणिक संस्थांना सौ. प्रेमलता रोंगे यांनी भेटी दिल्या. यामध्ये मारुतीराव हरीराव महाडिक आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज मोडनिंब, संजीवनी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मोडनिंब, वसुंधरा इंग्लिश मीडियम स्कूल मोडनिंब, उमा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मोडनिंब, संगनबसवेश्वर शिवयोगी कन्या प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, मोडनिंब, नंदीकेश्वर हायस्कूल उपळाई, महाराणी ताराराणी कन्या प्रशाला उपळाई, मदर पब्लिक स्कूल माढा, महात्मा फुले विद्यालय वरवडे, न्यू इंग्लिश स्कूल आढेगाव आणि न्यू इंग्लिश स्कूल टाकळी या शाळा-महाविद्यालयांचा समावेश होता. या भेटीदरम्यान त्यांनी संबंधित संस्थांचे पदाधिकारी, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षिकांसोबत संवाद साधला. डॉ. रोंगे सरांची काम करण्याची पद्धत, प्रत्येक प्रश्नाचा अभ्यासपूर्ण विचार, प्रशासकीय प्रक्रियेची जाण, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता आणि प्रश्न मार्गी लागेपर्यंत सातत्याने पाठपुरावा करण्याचे महत्त्व त्यांनी विशद केले. यावेळी महात्मा फुले विद्यालयाचे प्राचार्य के. बी. होडगर यांनी डॉ. रोंगे सरांच्या कार्याविषयी विश्वास व्यक्त करताना सांगितले, 'डॉ. बी.पी. रोंगे सरांच्या कार्यपद्धतीवर आमचा पूर्ण विश्वास आहे. शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी ते प्रयत्नशील असून त्यांच्या पुढाकारामुळे आमचे प्रश्न मार्गी लागत आहेत. त्यामुळे आम्ही त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत.' शिक्षकांच्या प्रश्नांना प्राधान्य देणे, शैक्षणिक क्षेत्रातील घटकांशी थेट संवाद साधणे आणि प्रशासकीय पातळीवर प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न करणे, या बाबींमुळे डॉ. बी. पी. रोंगे सरांचे नाव सध्या शिक्षकवर्गात चर्चेत आहे. पुणे विभागातील पाचही जिल्ह्यांत सुरू असलेल्या भेटीगाठी आणि शिक्षकांशी साधला जाणारा संवाद यामुळे त्यांच्या कार्याची व्याप्ती वाढताना दिसत आहे. शिक्षकांच्या प्रश्नांची जाण, प्रश्न सोडविण्याची कृतीशील भूमिका आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा या मुद्द्यांमुळे डॉ. बी. पी. रोंगे सरांच्या कार्याकडे शिक्षकांचे लक्ष वेधले जात आहे. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिक्षकवर्गातील या संवादाला महत्त्व प्राप्त झाले असून, शिक्षकांच्या प्रश्नांवर ठोस काम करणाऱ्या नेतृत्वाबाबतची अपेक्षा अधिक ठळक होत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पं. भुवनेश कोमकली यांच्या सुरेल स्वरांनी विठुरायाच्या चरणी स्वरांचा भक्तिजागर!

## वारकरी संप्रदाय आणि संतसाहित्याने देशात समता व बंधुतेची शिकवण दिली : प्रा. मधुकर पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या वतीने आयोजित श्री रुक्मिणी नवरात्र संगीत महोत्सवातील तिसरी स्वरांची माळ भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. प्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. कुमार गंधर्व यांचे नातू पं. भुवनेश कोमकली यांच्या गायनाने रसिक मंत्रमुग्ध झाले.




मंदिर समितीचे सहअध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर, सन्माननीय सदस्य आणि कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांच्या मार्गदर्शनाखाली महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. तिसऱ्या दिवसाच्या कार्यक्रमाची सुरुवात मंदिर समितीचे व्यवस्थापक श्री. प्रवीणकुमार घम व मान्यवर कलाकार यांच्या हस्ते श्री विठुरायाच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी मंदिर समितीच्या वतीने कलाकारांचा सन्मान करण्यात आला.

महोत्सवाच्या पहिल्या सत्रात प्रसिद्ध व्याख्याते प्रा. मधुकर पाटील यांनी 'संतसाहित्याची परंपरा आणि वारकरी संप्रदाय' या विषयावर विचार मांडले. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात अध्यात्माचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी संतपरंपरेच्या सामाजिक योगदानाचा आढावा घेतला.

ते म्हणाले की, वारकरी संप्रदायातील संतांनी भागवत धर्माचा प्रचार आणि प्रसार करून देशात समता, बंधुता व मानवतेची शिकवण दिली. संतसाहित्य ही केवळ भक्तीची परंपरा नसून सामाजिक एकात्मता आणि मानवी मूल्ये जपणारी चळवळ आहे. संत ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी सोहळा हा वारकरी परंपरेतील सामूहिक भक्तिभाव आणि शिस्तीचे आदर्श उदाहरण आहे.

आजच्या डिजिटल युगात मोबाईल आणि सोशल मीडियामध्ये गुंतलेल्या नव्या पिढीला संतविचार व अध्यात्माशी जोडणे आवश्यक आहे. वारकरी परंपरेचे महत्त्व नव्या पिढीपर्यंत पोहोचवून अध्यात्मिक चळवळ अधिक बळकट करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन प्रा. पाटील यांनी केले.

दुसऱ्या सत्रात पं. भुवनेश कोमकली यांनी नंद रागातील 'गोविंद बीन बजायी, राजन तो आजा' या रचनेने मैफलीला सुरुवात केली. त्यानंतर तिलंग रागातील 'बासुरी बजायी' ही बंदिश सादर करून त्यांनी आपल्या शास्त्रीय गायकीतील स्वरवैविध्याचे दर्शन घडविले.

यानंतर पं. कुमार गंधर्व यांनी अजरामर केलेल्या 'गुरा तो जीने', 'काम क्रोध आम्ही वाहिले विठ्ठल', 'निके निके चलन लागी' आणि 'नाम घेता वाया गेला' या अभंगरचनांच्या सादरीकरणातून भक्तिरसाची अनुभूती दिली. रसिकांच्या आग्रहास्तव 'सुनता है गुरु ज्ञानी' ही रचना सादर करून त्यांनी मैफलीची सांगता केली. त्यांच्या गायनाला उपस्थित रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली.

या मैफलीला तबल्यावर श्रीधर मांडरे, हार्मोनियमवर स्वानंद कुलकर्णी, पखवाजवर ज्ञानेश्वर दुधाणे आणि टाळाची साथ माऊली पिसे यांनी केली. कलाकारांच्या सुरेल साथसंगतीमुळे कार्यक्रमाची रंगत वाढली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन ज्ञानेश्वर दुधाणे यांनी केले.

श्री रुक्मिणी नवरात्र संगीत महोत्सवाच्या आगामी चार दिवसांत महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक-गायिकांचे कार्यक्रम होणार आहेत. संगीतप्रेमी व भाविकांनी या सांगीतिक पर्वाचा लाभ घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने करण्यात आले आहे. महोत्सव यशस्वी करण्यासाठी मंदिर समितीचे अधिकारी व कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

---

### नवरात्र महोत्सव २०२६; नवरात्र महोत्सव: चौथी माळ

## श्री विठ्ठलास अलंकार, रुक्मिणी मातेस पारंपारिक सरस्वती माता पोषाखासह अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : घटस्थापनेपासून नवरात्र महोत्सवास सुरवात झालेली असून, या निमित्त दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे चौथ्या दिवशी श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये रूक्मिणी मातेस सरस्वती माता पोषाख परिधान करण्यात आला असल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.



श्री विठ्ठलास सोन्याचा मुकुट, कौस्तुभ मणी, हिरा कंगनजोड, मोत्याचा तुरा, मोत्याची कंठी एक पदरी, मोत्याची कंठी मोती असलेली, मोत्याची कंठी दोन पदरी, तोडेजोड, मोहरांची माळ, मोठी बोरमाळ, पुतळ्यांची माळ, तुळशीची माळ, मत्स्य जोड, शिरपच मोठा दहा लोक असलेला, शिरपेच मोठा दोन लोलक असलेला इत्यादी प्रकारचे अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच रुक्मिणी सोन्याचे मुकुट, मोठी नथ, कर्णफुले जोड, खड्यांची वेणी, पाचुची गरसोळी, चिंचपेटी हिरवी, तन्मणी मोठा, मद्रासी कंठा, ठुशी, तुळशीहार, सोन्या मोत्याचे ताणवाड जोड, चंद्र मोत्याचा कंठा, खड्याची बिंदी, मन्यामोत्याच्या पाटल्या जोड, मोत्यांचे मंगळसूत्र, सोन्याचे बाजूबंद कलमाडी, रुळजोड, पैंजणजोड, तारामंडळ इत्यादी प्रकारचे अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच राधिका मातेस नक्षी टोप, ठुशी, पुतळ्याची माळ, चिंचपेटी पांढरी, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, व सत्यभामादेवीला चांदीचा मुकुट,लक्ष्मी हार,चिंचपेटी तांबडी,जवमनी पदक, जवेची माळ, हायकोल, पुतळ्यांची माळ, ठुशी इत्यादी प्रकारचे अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत, तसेच श्री व्यंकटेशस सोने मुकुट, चंद्रहार १५ पदरी, मत्स्य चांदीचा, तांदळा हार ७ पदरी, जवेची माळ दोन पदरी इत्यादी अलंकार परिधान करण्यात आलेले आहे.

तसेच मंदिर समितीच्या अख्त्यातरीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई-तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपारिक पोषाख करण्यात आला आहे.

मंदिर समितीचे सहअध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर व सर्व सन्माननीय सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली नवरात्र महोत्सवातील धार्मिक विधी व परंपरांचे नियोजन करण्यात येत आहे. या महोत्सवाची तसेच धार्मिक परंपरांची माहिती विविध समाजमाध्यमांद्वारे भाविकांपर्यंत पोहोचविण्यात येत असल्याने भाविकांकडून समाधान व्यक्त होत आहे, असे मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी सांगितले.

---

## सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री यांचा वाढदिवस एक टन चारा पाणी टँकर देत वाढदिवस साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : महाराष्ट्र राज्याची ग्रामविकास मंत्री व सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री, ना. जयकुमार भाऊ गोरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने बार्डी येथील जंगलामध्ये असलेल्या गाईंच्यासाठी युवा नेते अनुप परिचारक यांच्या हस्ते एक टन चारा व पाणी टँकर देत वाढदिवस साजरा केला व दुष्काळामुळे मुक्या जनावरांना चारा नाही पाण्याची दुर्भिक्ष असून पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केलेल्या आव्हानाला प्रतिसाद देत भारतीय जनता पार्टी कर्क मंडळाच्या वतीने हा उपक्रम राबवण्यात आला यावेळी पंढरपूर तालुक्याचे सभापती शुभम मागवणे, जिल्हा परिषद सदस्य आदिनाथ देशमुख, भाजप मंडलाध्यक्ष हर्षद कदम, हरिभाऊ गावंदरे, शिबीर भाई इनामदार, माणिक आबा माने



पांडुरंग सहकारी साखर कारखान्याची संचालक दिनकर नामदेव कवडे कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक अभिजीत दिनकर कवडे सरपंच अमोल खंदारे सदस्य बबन सय्यद, कल्याण बळीराम कवडे सागर चव्हाण माऊली बजरंग अक्षय कवडे अक्षय रणदिवे प्रकाश गायकवाड यांच्यासह भाजपचे कार्यकर्ते उपस्थित होते.

---

## दुष्काळच्या झळा सगळ्या आता सर्वसामान्याच्या ताटात!

**ज्वारी ८० रुपये गहू ५० रुपयांच्या उंबरठ्यावर**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर - यंदा पावसाच्या अनिमित्ततेमुळे निर्माण झालेले दुष्काळी परिस्थितीचा फटका आता शेतकऱ्याबरोबर सर्वसामान्य लोकांनाही बसला आहे. पावसाअभावी खरीप हंगामातील अनेक पिकांचे नुकसान झाले आहे रब्बी हंगामाच्या पेरणीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बाजारामध्ये गहू ,ज्वारी, बाजरी मका, आणि विविध कडधान्य दरात वाढ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. आणि महागाईने त्रस्त असलेल्या सर्वसामान्य नागरिकांच्या ताटातील भाकरी व चपाती भागण्याची चिन्हे दिसत आहेत. सध्या ज्वारीचा दर प्रति किलो ८० रुपये पोचला असून, गव्हाचे दर पन्नास रुपये दिशेने वाटचाल करत आहे. भाजीचा दर ४० रुपये तर मक्याचा दर ३५ रुपये किती किलो पर्यंत पोहोचल्याचे सांगितले जात आहे. धान्याच्या वाढत्या किमतीमुळे रोजंदारीवर काम करण्याच्या मजुरांची अल्प उत्पन्न गटातील कुटुंबे व शेतकरी व संमेल ग्राहकाचे आर्थिक बजेट बिघडण्याची शक्यता आहे.

सोयाबीन भुईमूग मका आणि इतर कडधान्यांच्या उत्पादनातही यंदा विपरीत परिणाम झाला आहे. काही ठिकाणी पिके जळेल तर काही ठिकाणी उत्पन्नात घट निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्याच्या हातात अपेक्षित उत्पन्न पडण्याची चिन्हे कमी झाली आहेत. दरवाढीचा दबाव वाढू शकतो.

रब्बी हंगामातील पेरणी कमी झाली पिकांना पुरेशी पाणी कमी झाले. पुरुषी पाणी मिळाले नाही तर आगामी धान्याचे उत्पादन घोषित धान्याचे उत्पादन घटू शकतील खरीप आणि रब्बी हंगामात परिणाम झाल्यास बाजारपेठेत धन्य पुरवठा कमी होत असल्याने तेच थेट परिणाम ग्राहकांच्या किशोर होऊ शकतो. ज्वारी आणि बाजरी ही ग्रामीण भागातील व आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणाऱ्या कुटुंबाच्या आहारातील महत्त्वाची धान्य आहे वाढत्या किमतीमुळे या धान्यापासून बनवणारी भाकरी ही आता होत आहे ज्वारीच्या



प्रति किलो ८० रुपये , बाजरीचा दर ४० रुपये च्या दिशेने वाढ असल्याने होणाऱ्या रोजचा अन्न धान्यावरील खर्च वाढणार आहे. दुसरीकडे कडधान्याची सर्वसामान्य आवाक्याच्या बाहेर जात असल्याने चित्र आहे काही डाळिंबीची दर प्रति किलो दीडशे रुपये च्या पुढे जाऊन १७० ते १८० रुपयांपर्यंत पोहोचण्यामध्ये सांगितली जात आहे साबुदाणा जिगर ८० ते ९० रुपये प्रति किलो दर आहे इतर इतरही खाद्यपदार्थाची दर वाढल्याने घर खर्चात ताळमेळ राखणे कठीण होऊ लागली आहे.

---

## नवरात्र महोत्सव निमित्त आदर्श प्राथमिक विद्यालय मुख्याध्यापिका व शिक्षकांचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : नवरात्र महोत्सवाचे औचित्य साधून शाळेचा परिसर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी सातत्याने मेहनत घेणाऱ्या सफाई कामगार व महिलांचा तसेच मुख्याध्यापिका व शिक्षकांचा समाजसेवक मुजमिल कमली वाले यांच्या वतीने सन्मान करण्यात आला. या उपक्रमातून कष्टकरी तुला विरोध महिला प्रति कृतज्ञता व्यक्त करत समाजात माणुसकी समानता आणि शंप्रतिष्ठेच्या पेनादायी संदेश देण्यात आला.

आदर्श प्राथमिक विद्यालयातील स्वच्छता सेविका पार्वती लाल बोंद्रे, सविता कुलकर्णी मा सुरवसे आणि सौ प्रीती घोटेकर यांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला व शाळेतील विद्यार्थ्यांनी शिक्षकांना स्वच्छ व आरोग्यदायी वातावरण मिळावी




यासाठी, या महिला सातत्याने परिश्रम घेत असतात व त्यांच्या योगदानाची दखल घेऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

याच कार्यक्रमात आदर्श प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ राजश्री घंटी, शिशुविहारच्या मुख्याध्यापिका सौ आदिती देशमुख तसेच शिक्षिका मैत्री केसकर, शितल शेट्टी लक्ष्मी बोडके तृप्ती वाटरकर वेताळ डोईफोडे श्वेता ताड सौ दगडे आणि माधवी खासणीस यांचाही सन्मान करण्यात आला.

नवरात्र महोत्सवाच्या देवीच्या विविध रूपांची पूजा केली जाते मात्र, आपल्या आजूबाजूच्या कष्ट करणाऱ्या महिलांच्या कार्याचा आदर करून त्यांना सन्मान देणे ही देखील स्त्रीशक्तीची खरी उपास नाही सफाई कामगार आणि महिला शाळेच्या परिसर स्वच्छ ठेवून महत्वपूर्ण योगदान देतात परंतु त्यांच्या कष्टाची अनेकदा त्यांची दखल घेतली जात नाही. ही बाब लक्षात घेऊन त्यांच्या कार्यप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांची कौतुक मुख्याध्यापिका व शिक्षका व शाळेचा परिसर स्वच्छ ठेवणाऱ्या महिला सेविका या सर्वांचे योगदान समाजासाठी मोलाच्याही कोणतेही काम लहान नसते आणि प्रत्येकाच्या कष्टाचा आदर करणे हीच खरी माणुसकी आहे हा विचार या उपक्रमातून अधोरेखित करण्यात आला.

या उपक्रमाची संस्थेचे अध्यक्ष सतीश जी पुरंदरे, संस्थेच्या माजी अध्यक्ष विनाताई जोशी, रेखाताई उंबरकर डॉक्टर अनिल जोशी अँड ज्ञानेश आराध्य माजी आमदार श्री प्रशांत परिचारक, रेखाताई भालेराव श्री प्रशांत कुलकर्णी डॉक्टर तेजस भोपटकर आणि श्री प्रसाद संत यांनी कौतुक केली व माणुसकी हीच खरी तुझ्या कष्टाचा सन्मान हीच खरी सेवा या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे कष्टकरी महिलांच्या कार्याचा गौरव झाला व समाजसेवेच्या निमित्ताने राबविण्यात आलेल्या या उपक्रम महिलांचा सन्मान सामाजिक बांधिलकी आणि श्याम प्रतिष्ठा जपणारा प्रेरणादायी उपक्रम ठरला.

---

**संस्थापक डॉ.बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर उपक्रम संपन्न**

## स्वेरी फार्मसीमध्ये राष्ट्रीय औषधनिर्माण सप्ताह उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित फार्मसी महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय औषधनिर्माण सप्ताह-२०२६ चे औचित्य साधून 'स्वस्थ भारत: प्रतिजैविक प्रतिरोधावर मात (अँटीमायक्रोबियल रेजिस्टन्स)' या राष्ट्रीय महत्त्वाच्या संकल्पनेवर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.




या सप्ताहात एकूण १७ विविध शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. सध्याच्या काळात प्रतिजैविकांचा अतिवापर आणि चुकीच्या वापरामुळे निर्माण झालेला प्रतिजैविक प्रतिरोध हा गंभीर सार्वजनिक आरोग्य धोका बनला असून या धोक्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये आणि समाजात जनजागृती करणे, औषधांचा योग्य वापर आणि औषधनिर्मात्याची आरोग्य सेवेतील जबाबदार भूमिका अधोरेखित करणे हा या सप्ताहाचा मुख्य उद्देश होता. या सप्ताहात रांगोळी स्पर्धा, मार्गिका सजावट स्पर्धा, लघुचित्रमालिका निर्मिती स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, पथनाट्य स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, वस्तुसंग्रहालय तयारी, दोरीउड्या स्पर्धा, रस्सीखेच स्पर्धा, १०० मीटर धावण्याची शर्यत, ४ बाय १०० मीटर रिले शर्यत, प्रश्नमंजुषा, भित्तीपत्रक सादरीकरण आणि खजिना शोध अशा एकूण १७ स्पर्धांचा समावेश करण्यात आला होता. या स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळाली. प्रश्नमंजुषा, भित्तीपत्रक सादरीकरण, वादविवाद आणि वस्तुसंग्रहालय तयारी या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडून संशोधन, सादरीकरण आणि तर्कशुद्ध विचार करण्याचे कौशल्य विकसित झाले. रांगोळी, चित्रकला, मेंदी, मार्गिका सजावट आणि लघुचित्रमालिका निर्मिती सारख्या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळून औषध जनजागृतीचा संदेश कलेच्या माध्यमातून प्रभावीपणे पोहोचवता आला. त्याचबरोबर पथनाट्य स्पर्धा ही समाजात थेट जाऊन औषधांबाबत जागरूकता निर्माण करण्याचे प्रभावी माध्यम असून यातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, संवाद कौशल्य आणि सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण होण्यास मदत झाली. दोरीउड्या, रस्सीखेच, धावणे आणि रिले शर्यत यांसारख्या क्रीडा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचे शारीरिक स्वास्थ्य सुधारण्याबरोबरच संघभावना, खिलाडूवृत्ती आणि एकता वाढीस लागली, तर खजिना शोध सारख्या खेळातून बुद्धिमत्ता आणि सांघिक कार्याचा कस लागला. सर्व विद्यार्थ्यांनी या १७ स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त आणि सक्रिय सहभाग नोंदवला. या सर्व स्पर्धा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आयोजित करण्यात आल्या असून प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या आवडीनुसार सहभागी होण्याची संधी मिळाली. संस्थेचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सांस्कृतिक समन्वयकांच्या नियोजनाखाली हा उपक्रम पार पडला. या उपक्रमांमुळे केवळ औषधनिर्माण शिक्षणालाच नव्हे तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासालाही चालना मिळून 'स्वस्थ भारत' चे ध्येय साध्य करण्यासाठी सक्षम औषधनिर्माते तयार होतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

हा उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त वीरमाता, वीरपिता, वीरपत्नी व माजी सैनिकांचा गौरवपूर्ण सहभाग; संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन

## सैनिकांच्या त्यागाला मानवंदना; संविधानिक मूल्यांचा जागर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट प्रतिनिधी नागपूर : सतराव्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपूर येथील पवित्र दीक्षाभूमीवर यश सिद्धी आजी-माजी सैनिक बहुउद्देशीय वेल्फेअर असोसिएशन, महाराष्ट्र राज्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार मंच आणि माजी सैनिक संघटना, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात माजी सैनिक, वीरपत्नी, वीरमाता आणि वीरपिता यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सलामी देऊन मानवंदना अर्पण केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित माजी सैनिकांनी सलामी देत मानवंदना दिली. यावेळी महार रेजिमेंटचे 'महार गान' सादर करण्यात आले. त्यानंतर उपस्थित सर्व मान्यवर आणि सैनिकांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. या उपक्रमातून संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांप्रती आपली बांधिलकी व्यक्त करण्यात आली.

**आयोजकांच्या परिश्रमातून कार्यक्रम यशस्वी**

या कार्यक्रमाचे आयोजन आयुष्यमान कॅप्टन दत्ता गवई, आयुष्यमान सुभेदार सतिंदर चावरे, सुभेदार मनोज चव्हाण, नायब सुभेदार पंजाब पाटील, सुभेदार मेजर राजकुमार मेश्राम आणि आयुष्यमान शरद चोरपगार यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजकांनी विशेष परिश्रम घेतले.

राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांसह विविध रेजिमेंटच्या सैनिकांची उपस्थिती

या कार्यक्रमाला राज्याध्यक्ष सुभेदार प्रदीप गायकवाड, राज्य उपाध्यक्ष आयुष्यमान शिवपुत्र घटकांबळे, राज्य विधी सल्लागार राजेंद्र खोब्रागडे, राज्य कोषाध्यक्ष श्यामराव भोसले, राज्य प्रवक्ता आयुष्यमान गजानन इंगळे, युद्धवीर लिंबाजी कांबळे, सोलापूर जिल्हा संघटक सूर्यकांत गजघाटे, पुणे जिल्हाध्यक्ष सुभेदार संतोष वानखडे आणि पुणे जिल्हा उपाध्यक्ष पोपट आल्हाट यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

तसेच विविध रेजिमेंटमधील वीर सैनिक, वीर नारी आणि वीरपत्नी यांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

**सैनिकांच्या त्यागाला मानवंदना; संविधानिक मूल्यांचा जागर**

देशाच्या संरक्षणासाठी योगदान देणाऱ्या माजी सैनिकांचा, तसेच देशसेवेत आपल्या प्रियजनांचे योगदान देणाऱ्या वीरमाता, वीरपिता आणि वीरपत्नींचा या कार्यक्रमातील सहभाग विशेष महत्त्वाचा ठरला. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने दीक्षाभूमीवर आयोजित या कार्यक्रमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा, भारतीय संविधानाच्या मूल्यांचा आणि देशसेवेच्या भावनेचा संदेश देण्यात आला.

दीक्षाभूमीवरील या उपक्रमातून महामानवांना अभिवादन करण्यासोबतच देशसेवा, सामाजिक बांधिलकी आणि संविधाननिष्ठेचा जागर करण्यात आला.

---

## भुरीकवठे येथे भारतरत्न डॉ. कलाम जयंतीनिमित्त वाचन स्पर्धा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भुरीकवठे, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर (प्रतिनिधी) - येथील ज्ञानदान सार्वजनिक मोफत वाचनालयाच्या सभागृहात भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

प्रारंभी जि.प. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. चव्हाण गुरुजी यांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना डॉ. कलाम यांच्या जीवनकार्याची माहिती सांगितली.

यावेळी वाचन संस्कृती वाढावी या हेतूने इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांमध्ये वाचन स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमास वाचनालयाचे पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

---

## आयसीआयसीआय बँकेकडून श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरास सीएसआर निधीतून १० हजार पिशव्यांची मोफत भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांना आयसीआयसीआय बँकेच्या सामाजिक दायित्व निधीतून (उडठ) सेवाभावी तत्त्वावर १० हजार पिशव्या मोफत प्राप्त झाल्या आहेत. या उपक्रमामुळे श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या पूजा करणाऱ्या भाविकांना प्रसाद घेऊन जाण्यासाठी सुविधा उपलब्ध होणार आहे.

यावेळी मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव तसेच आयसीआयसीआय



बँकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या तुळशीपूजा, पाद्यपूजा व नित्यपूजा करणाऱ्या भाविकांना पूजेनंतर प्रसाद दिला जातो. हा प्रसाद भाविकांना सोयीस्करपणे घरी घेऊन जाता यावा, या उद्देशाने प्राप्त झालेल्या पिशव्यांचा वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे भाविकांना प्रसाद घेऊन जाणे अधिक सुलभ होणार आहे.

आयसीआयसीआय बँकेने सामाजिक दायित्वाच्या भावनेतून केलेल्या या सहकार्याबद्दल श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने बँकेचे आभार व्यक्त करण्यात आले.

---

## धम्मचक्र प्रवर्तन दिनी जाधव दाम्पत्याचा मानवतेचा संकल्प; देहदान व अवयवदानातून बाबासाहेबांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी बाळासाहेब अहिरे - उल्हासनगर : धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे औचित्य साधून करुणा महेंद्र जाधव आणि महेंद्र किसनराव जाधव या दाम्पत्याने मरणोत्तर देहदान व अवयवदान करण्याचा संकल्प केला आहे. या दाम्पत्याने आवश्यक अर्ज भरून सामाजिक बांधिलकी जपणारा निर्णय घेतला असून, त्यांच्या या उपक्रमातून मानवसेवेचा प्रेरणादायी संदेश देण्यात आला आहे.

धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पवित्र प्रसंगी घेतलेल्या या निर्णयातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यात आले. मृत्यूनंतरही आपले शरीर आणि अवयव गरजू रुग्णांच्या उपयोगी पडावेत, या उदात्त भावनेतून जाधव दाम्पत्याने हा संकल्प केला आहे.

मृत्यूनंतरही दुसऱ्याच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करता येतो. देहदान आणि अवयवदान हे मानवतेची सेवा करण्याचे श्रेष्ठ माध्यम आहे, असा प्रेरणादायी संदेश या उपक्रमातून समाजासमोर आला आहे.

जाधव दाम्पत्याच्या या निर्णयामुळे देहदान व अवयवदानाबाबत समाजात जनजागृती होण्यास मदत होईल. अधिकाधिक नागरिकांनी या विषयाची माहिती घेऊन देहदान आणि अवयवदानाचा संकल्प करावा, असे आवाहन या निमित्ताने करण्यात येत आहे.




---

## श्री माणकेश्वर वाचनालयात डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी - निफाड येथील श्री माणकेश्वर वाचनालय येथे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम जयंती साजरी करण्यात आली. वाचनालयाचे अध्यक्ष .मधुकर बाबुराव शेलार यांचे हस्ते माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.




याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाचनालयाचे संचालक तनवीर राजे यांनी केले. चिटणीस . सुनील चिखले संचालक विजय धारराव .दत्ताकाका उगावकर वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर बाबुराव शेलार यांनी त्यांच्या जीवन कार्यावर मनोगत व्यक्त केले.

यावेळी वाचनालयाचे माजी संचालक अशोक पगारे सभासद सुखदेव कर्वे, अशोक कांदळकर, सोपानराव खालकर ग्रंथपाल. नितीन बनसोडे सहाय्यक. ग्रंथपाल आरती जंगम लेखनिक नंदकुमार पुंड आदी उपस्थित होते.

---

**मजुरांच्या कामावर उपस्थितीबाबत प्रश्नचिन्ह, एनएमएमएस प्रणालीच्या वापराबाबत चौकशीची मागणी**

# कळंब तालुक्यातील मनरेगा कामांतील कथित भ्रष्टाचाराची एसआयटीमार्फत चौकशी करण्याच्या मागणीसाठी लहुजी शक्ती सेनेचे आमरण उपोषण सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब (प्रतिनिधी) - कळंब तालुक्यात विकसित भारत जी राम जी योजनेअंतर्गत सुरू असलेल्या मनरेगा कामांमध्ये कथित गैरव्यवहार होत असल्याचा आरोप करत या प्रकरणाची विशेष तपास पथकामार्फत (एसआयटी) चौकशी करण्याच्या मागणीसाठी लहुजी शक्ती सेनेच्या वतीने संघटनेचे प्रदेश महासचिव बालाजी भाऊ गायकवाड व सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भाऊ पाटुळे हे आमरण उपोषणाला बसले आहेत. यासंदर्भात तहसीलदार, कळंब यांना निवेदन देण्यात आले असून, दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.




लहुजी शक्ती सेनेने दिलेल्या निवेदनानुसार, कळंब तालुक्यात दुष्काळी परिस्थिती असताना ग्रामीण भागातील गरीब व गरजू मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्या विविध योजनांमधून कामे सुरू केली जातात. मात्र, या कामांच्या अंमलबजावणीत गैरप्रकार होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. शासनाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून देण्याची जबाबदारी असलेल्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्यपद्धतीवरही निवेदनात प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

**मजुरांच्या कामावर उपस्थितीबाबत प्रश्नचिन्ह**

ग्रामीण भागातील मजुरांच्या घामावर शेतरस्ते व इतर विकासकामे केली जात असताना संबंधित यंत्रणेकडून कामकाजात अनियमितता होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तालुक्यातील ग्राम रोजगार सहाय्यक, तांत्रिक अधिकारी, पीटीओ, एपीओ, ऑपरेटर तसेच संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या कामकाजाची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

काही ठिकाणी मजूर प्रत्यक्ष कामावर उपस्थित नसतानाही त्यांच्या नावावर कामे दाखवली जात असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. तसेच मजुरांच्या उपस्थितीची नोंद, कामाचे छायाचित्रण आणि इतर प्रक्रियांमध्ये अनियमितता होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. या सर्व बाबींची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**स्वतंत्र एसआयटी नेमून चौकशी करा**

**या प्रकरणाची चौकशी करताना संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांचा हस्तक्षेप होऊ नये, यासाठी स्वतंत्र विशेष तपास पथकाची (एसआयटी) नियुक्ती करावी,तसेच चौकशी निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने व्हावी,व कथित गैरव्यवहाराची सखोल तपासणी करून दोषी असलेल्या अधिकारी कर्मचारी यांच्या वर योग्य ती कारवाई झाल्याशिवाय आम्ही आमरण उपोषण सोडणार नाहीत.**

एनएमएमएस प्रणालीच्या वापराबाबत चौकशीची मागणी

मनरेगा कामांमध्ये मजुरांची उपस्थिती नोंदविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या एनएमएमएस प्रणालीच्या माध्यमातून मजुरांच्या छायाचित्रांची नोंद केली जाते. मात्र, प्रत्यक्ष कामावर उपस्थित असलेल्या मजुरांची आणि नोंदींमध्ये दाखविलेल्या मजुरांची पडताळणी करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

काम सुरू झाल्यापासून ते काम पूर्ण होईपर्यंत मजूर प्रत्यक्ष काम करतात का, कामाच्या ठिकाणी आवश्यक साहित्य वापरले जाते का? तसेच छायाचित्रे आणि व्हिडिओंच्या नोंदी प्रत्यक्ष परिस्थितीशी सुसंगत आहेत का?याची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, मजुरांच्या नावावर बिले काढली जात असताना संबंधित मजूर प्रत्यक्ष कामावर उपस्थित होते का?याचीही स्वतंत्रपणे पडताळणी करावी, असे संघटनेने म्हटले आहे. या प्रकरणात दोष आढळल्यास संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि जबाबदार व्यक्तींवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.